साप्रवि/मावक/जाती प्रमाणपत्र पडताळणी/

महावितरण

एस्ट्रेला बॅटरीज् विस्तारीत इमारत,
तळ मजला,प्लॉट नं.१,धारावी रोड,
माटुंगा,मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.७७ दिनांक २१/९/२००६.

विषय : अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर पदोन्नती देण्यापूर्वी तसेच सरळसेवा भरती करतांना उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्रांची /जाती दाव्याची वैधता तपासणे बंधनकारक करणेबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.सीबीसी-१२-२०००/२५२/प्र.क्र.१/इमाव-५ दिनांक २५.१.२०००.

२) शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.-९१/मावक-५ दिनांक ८.१२.२००३.

३) शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५ दिनांक ५.३.२००५.

---

प्रधान सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक ५.३.२००५ अन्वये ,अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर पदोन्नती देण्यापूर्वी तसेच सरळसेवा भरती करतांना त्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्रांची/जाती दाव्याची वैधता तपासणी करणे बंधनकारक असल्याचे कळविले असून सदर मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवेत तसेच शासन अंगीकृत संस्थामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत लागू रहातील, असे निर्देश दिले आहेत.

२. उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करतांना ज्या मागासवर्गीय कर्मचारी/अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची पडताळणी अद्याप झालेली नाही, तथापि असे कर्मचारी सद्यस्थितीत पदोन्नतीच्या क्षेत्रात (Zone of Consideration) येत असतील त्यांचे ६ (सहा) महिने अगोदर जाती प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावी व त्यानंतरच पदोन्नती द्यावी. तसेच सरळसेवेने भरती करतांना उमेदवाराने जाती प्रमाणपत्राची वैधता ६ (सहा) महिन्यात सादर करणे बंधनकारक राहील, असेही सूचित केले आहे.

३. शासनाच्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग – कल्याण विभागाकडील शासन निर्णय क्र. सीबीसी -१२ - २०००/२५२/प्र. क्र. -१/ इमाव -५ , दि. २५.१.२००० अनुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या/कर्मचा-यांच्या जाती प्रमाणपत्रांची तपासणी करण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती येथे ६ (सहा) समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

त्या समित्यांची कर्तव्य, रचना, जाती प्रमाणपत्र तपासण्याची कार्यपध्दती इत्यादीबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. सदरच्या शासन निर्णयाची प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

४. सर्व संबधीत नियुक्ती अधिका-याच्या माहितीसाठी असेही कळविण्यात येते की, या विषयाबाबतच्या शासन निर्णयाची माहिती शासनाच्या "WWW.Maharashtra.gov.in" या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

५. वरील शासन परिपत्रकाची अंमलबजावणी क्षेत्रिय कार्यालयातील सर्व नियुक्ती अधिका-यांनी त्याचे स्तरावर नियुक्त करण्यात येणा-या मागासवर्गीय उमेदवाराच्या जातीच्या दाखल्याचो अथवा पदोन्नती देतांना मागासवर्गीय कर्मचा-याच्या जातीच्या दाखल्याची वैधता पडताळून घेण्याची जबाबदारी राहील. तसेच मुख्य कार्यालय स्तरावर मागासर्गीयांची नियुक्ती करतांना अथवा मागासवर्गीय कर्मचा-यांची पदोन्नती करतांना त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी महा व्यवस्थापक (तांत्रिक-आस्था) व महा व्यवस्थापक (आस्था.) यांनी करावी.

६. उपरोक्त शासन परिपत्रक मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन स्विकृत केले असून संबधीत शासन परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

७. वरील प्रशासकीय परिपत्रकास सर्व स्तरावर प्रसिध्दी द्यावी तसेच सर्व नियुक्ती अधिका-यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी.

सोबत :

मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक-आस्था)

शासन परिपत्रक क्र.बीसीसी -१२-२०००/२५२/
प्र.क्र.-१/इमाव-५/ दिनांक २५.१.२००० ,
शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.-९१/
मावक-५ दिनांक ८.१२.२००३ व
शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१०/२००४/
प्र.क्र.५७०/मावक-५ दिनांक ५.३.२००५.

प्रति,

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील
कार्यकारी अभियंता यांचे स्तरापर्यंत प्रेषण यादीनुसार.

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती
इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांच्या
उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्र / दाव्यांची
तपासणी -----

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कामाचे
स्वरूप व अधिकाराबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग
आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग.
शासन निर्णय क्र. सीबीसी - १२- २०००/ २५२ / प्र. क्र. १ / इमाव -५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ जानेवारी, २०००

वाचा :- १) शासन परिपत्रक, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. सीबीसी - १६८० / ११९६१ / का - ५, दि. ६ मे, १९८० व शुध्दीपत्रक क्र. ३ जुन १९८०.

२) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. सीबीसी - १६८० / ६५३९६ (४९९) / का - ५, दि. ६ सप्टेंबर, १९८३.

३) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक सीबीसी-१६८३/गोप.२०१६/(१५३८)/का-५,दि.२३ सप्टेंबर, १९८३

४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. सीबीसी -१६८४ / गोप.५९२ / ( १९९९) / बीसीडब्लू-५ दि. १४ मार्च, १९८५

५) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १६८४ / गोप. ५९२ / ( १९९९) / बीसीडब्लू - ५, दि. १६ ऑक्टोबर, १९८५.

६) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १०८४ / ७४९३२ / ( २०८३ ) / बीसीडब्लू - ५, दि. ५ डिसेंबर, १९८५.

७) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. सीबीसी - १५८४ / ७१७५१ / ( २२९७ ) / बीसीडब्लू - ५, दि. १८ एप्रिल, १९८६.

८) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. सीबीसी - १६८६ / १४६५८ / ( २४५२ ) / मावक -५, दि. १ एप्रिल, १९८७.

९) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. सीबीसी - १६८८/ (२८२१) / मावक -५, दि. २३ जुलै, १९८८

१०) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,

क्र. सीबीसी - १६९४ / ४०१२४ / प्र. क्र. २५६ / मावक -५, दि. २६ डिसेंबर, १९९४.

११) शासन पुरपत्रक , समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १६८४ / गोप ५१२ / (१९९१) / मावक - ५, दि. २७ एप्रिल, १९९५

१२) शासन निर्णय , समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / प्र. क्र. ४८ / मावक - ५, दि. ३ जुन, १९९६.

१३) शासन निर्णय , समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / सीआर - १२४ / मावक - ५, दि. २३ जुले, १९९६.

१४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / प्र. क्र. १२३ / मावक - ५, दि. २१ ऑगस्ट १९९६.

१५) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १६९६ / प्र. क्र. ४६ / मावक - ५, दि. ३ जुले, १९९७.

१६) शासन निर्णय , समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / प्र. क्र. ४८ / मावक -५, दि. ५ जुले, १९९७.

१७) शासन निर्णय , समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / प्र. क्र. ४८ / मावक -५, दि. १६ जुले, १९९७.

१८) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९७ / प्र. क्र. २०७ / मावक - ५, दि. १ जानेवारी, १९९८.

१९) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १६९६ / प्र. क्र. ४६ / (भाग - ३) / मावक -५, दि. १६ मार्च, १९९८.

२०) शासन पत्र समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९८ / २९०१२ / प्र. क्र. ३०५ / मावक -५, दि. १५ मार्च, १९९९.

२१) शासन परिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा विभाग
क्र. सीबीसी - १०९८ / प्र. क्र. २०७ / मावक -५,दि. ३ सप्टेंबर, १९९९.

२२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग क्र. सीबीसी- १०९८ / १४८५० / प्र. क्र. ११८ / इमाव -५, दि. २० डिसेंबर, १९९९.

शासन निर्णय : अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्गाच्या उमदेवारांच्या जाती प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती येथे सहा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्या समित्यांची कर्तव्ये, रचना, त्या समित्यांना मदत करण्यासाठी दक्षता पथकाची निर्मिती, जातीप्रमाणपत्र तपासण्याची कार्यपध्दती इत्यादी बाबतचे आदेश संदर्भाकित शासन आदेशान्वये दिलेले आहेत. त्यामध्ये काही सुधारणा करणे तसेच त्या सर्व तरतुदी एकत्रित करुन त्यांचे सुलभीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. वरील सर्व आदेशातील सारांश रुपातातील बदलांसह जाती प्रमाणपत्र तपासणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधितांनी वरील प्रवर्गातील जातींच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची पडताळणी करताना खालील आदेशांचे अनुपालन करावे.

२) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीत्यांची रचना.

२ (१) राज्यातील सहा महसूल विभागाकरिता असलेल्या जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना पुढील प्रमाणे आहे :-

१) अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे.

१) अतिरिक्त आयुक्त ( महसूल ), पुणे विभाग, पुणे - अध्यक्ष

२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे .- सदस्य

३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे - सदस्य सचिव

२) अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोकण विभाग, मुंबई.

१) अतिरिक्त आयुक्त ( महसूल ), कोकण विभाग, मुंबई - अध्यक्ष

२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, कोकण विभाग, मुंबई - सदस्य

३ ) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी , मुंबई - सदस्य सचिव

३) अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक.

१) अतिरिक्त आयुक्त ( महसूल ), नाशिक विभाग, नाशिक - अध्यक्ष

२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक - सदस्य

३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी - सदस्य सचिव

४) अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

१) अतिरिक्त आयुक्त ( महसूल ), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - अध्यक्ष

२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - सदस्य

३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी , औरंगाबाद- सदस्य सचिव

५) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर.

१) अतिरिक्त आयुक्त ( महसूल), नागपूर विभाग, नागपूर - अध्यक्ष

२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर - सदस्य

३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नागपूर - सदस्य सचिव

६) अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती.

१) अतिरिक्त आयुक्त ( महसूल), अमरावती विभाग, अमरावती - अध्यक्ष

२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती - सदस्य

३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, अमरावती - सदस्य सचिव

३. अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग दाव्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रत्येक सुनावणीच्या मुलाखतीच्या वेळी दोन सदस्यांची गणपूर्ती

आवश्यक राहील. जातीची वैधता प्रमाणपत्रे ही वरील तिन्ही अधिका-यांच्या सहया व कार्यालयाच्या [illegible] निर्गमित करणे आवश्यक आहे.

८. <u>अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामाचे स्वरुप.</u>

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या जाती प्रमाणपत्र तपासणी समितीला खालील प्रमाणे जातीच्या दाखल्याची तपासणी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तपासणीमध्ये जातीचे प्रमाणपत्र अवैध आढळल्यास ते रद्द व जप्त करण्याचे अधिकार समितीस राहतील. याबाबतीत तपासणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

१) व्यावसायिक वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषध निर्माणशास्त्र या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयात पहिल्या वर्षाकरिता प्रवेश घेणा-या त्यांच्या विभागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची ( अनुसूचित जमाती वगळून ) जातीच्या प्रमाणपत्रांची /जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

२) शासन सेवेत मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग / विविध निवड मंडळे, प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळे व निवड समित्या यांच्यामार्फत शिफारस करण्यात आलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या (अनुसूचित जमाती वगळून ) जातीच्या प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

३) शासनाच्या समाजकल्याण तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागामार्फत जातीच्या प्रमाणपत्रांच्या / दाव्यांच्या तपासणीबाबत सोपविलेली अन्य प्रकरणे तपासणे.

४) जे कर्मचारी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामध्ये राखीव असलेल्या पदावर नियुक्त झालेले आहेत अशा कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधित विभाग / कार्यालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या कर्मचा-यांच्या / अधिका-यांच्या जातीदाव्यांच्या प्रकरणांची तपासणी करणे.

५) या पूर्वी अमागासवर्गीय म्हणून शासन सेवेत प्रवेश केला आहे व त्यानंतर एखाद्याची जात मागासवर्गीय म्हणून घोषित केलेली आहे व मागासवर्गीय म्हणून त्यांना असलेल्या आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित असल्यास अशांचे जाती दावे तपासणे.

६) महाराष्ट्र राज्याचे कायम रहिवासी असलेल्या ज्या व्यक्तींची केंद्र शासनाच्या सेवेत व केंद्र शासनाच्या अंगीकृत उपक्रमात राखीव जागेवर नेमणूक करण्यात आली आहे अशा मागासवर्गीय व्यक्तींच्या ( अनुसूचित जमाती वगळून ) जातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करणे.

७) जिल्हापरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, निमशासकीय कार्यालय, बँका, शासकीय व निमशासकीय उपक्रम (उदा एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ इत्यादी ) व राज्य शासन अंगीकृत इतर संस्था इत्यादी मध्ये मागासवर्गीयांसाठी राखीव जागांवर ( अनुसूचित जमाती वगळून ) नेमणूकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचा-यांच्या / अधिका-यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे / दावे तपासणे.

८)एखाद्या उमदेवाराची / कर्मचा-याची पूर्वी अमागासवर्गीय म्हणून शासन सेवेत नियुक्ती झाली असेल व ते आता मागासवर्गीय असल्याचा दावा करीत असेल किंवा पूर्वी त्याच्या मागासवर्गाच्या विशिष्ट वर्गवारीचा दावा होता, परंतु तो आता मागासवर्गाच्या दुस-या वर्गवारीचा दावा करीत असेल अथवा त्याच्या जाती प्रमाणपत्रात नमूद असलेली जात यामध्ये तफावत असेल अशी जाती दाव्यांची प्रकरणे तपासणे.

९) शासन सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधित विभाग/ कार्यालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या जाती दाव्याच्या संदर्भात तपासणी करणे.

१०) मा. मुंबई उच्च न्यायालय, तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठाकडून अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या जातींच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी करण्यासाठी सोपविलेली सर्व प्रकरणे तपासणे.

११) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातींच्या नसलेल्या व्यक्तीला जर सक्षम अधिका-यांनी वरील प्रवर्गातील जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे अशा प्रकारच्या तक्रारींची तपासणी करणे.

१२) जातीचे प्रमाणपत्र देणा-या सक्षम अधिका-यांनी एखाद्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारल्यास त्या सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द १५ दिवसाच्या आत संबंधित अर्जदाराने समितीपुढे अपिल केल्यास त्यावर निर्णय देणे. (यासाठी संबंधित सक्षम अधिका-याने अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्याचे का नाकारण्यात आले याबाबतची कारणे कळवून सदरच्या निर्णयाविरुध्द संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे १५ दिवसाच्या आत अपिल अर्ज करु शकतात असे कळवावे.)

१३) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्गाच्या ज्या विद्यार्थ्यांनी आपले वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र या अभ्यासक्रमाचे पदवी शिक्षण खुल्या वर्गातून केले आहे व ते त्यांचे पुढील पदव्युतर शिक्षण मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर (अनुसूचित जमाती वगळून )घेऊ इच्छित असतील अशा विद्यार्थ्यांच्या जातीप्रमाणपत्राच्या अर्जांची तपासणी करणे.

(१४) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग करिता राखीव असलेल्या प्रभागातून निवडणूक लढवून निवडून आलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता जातीचे प्रमाणपत्र आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित जिल्हाधिकारी / संबंधित महापालिका आयुक्त, यांनी संबंधित अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे १५ दिवसाच्या आत पाठविल्यानंतर संबंधित जात प्रमाणपत्र तपासणी समितीने अशा उमेदवारांच्या जाती दाव्याची पडताळणी ४५ दिवसाच्या आत करून घेतलेल्या निर्णय संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्ताकडे पाठविणे.

५. अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्याची तपासणी प्रक्रिया मा. सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी ( विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७ / ९३ मधील सिव्हील अर्ज क्रमांक ५८५४ / ९४ ) दिलेल्या मार्गदर्शक सूचनेतील तरतुदीनुसार संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने.

६. <u>जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासणीकरिता समितीकडे सादर करावयाची कागदपत्रे.</u>

जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासण्याकरिता संबंधितांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावे समितीकडे पाठविणे आवश्यक आहे :-

(अ) संबंधित व्यक्ती ज्या ठिकाणची मूळ रहिवासी असेल त्याच ठिकाणच्या सक्षम अधिकाऱ्याने, शासनाने निर्धारीत केलेल्या नमुन्यात दिलेले जातीचे मूळ प्रमाणपत्र.

(ब) संबंधित व्यक्तीचे प्राथमिक व माध्यमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.

(क) संबंधित व्यक्तीने ज्या शाळेत / महाविद्यालयात शिक्षणक्रमाचे अंतिम वर्ष केले असेल / करीत असेल ती शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा त्या शाळा / महाविद्यालयाच्या दप्तरात असलेल्या जातीच्या नोंदीसंबंधीचे प्रमाणपत्र.

(ड) संबंधित व्यक्ती शासकीय सेवेत असेल तर त्याच्या सेवापुस्तकातील जाती विषयक नोंद असलेल्या पृष्ठाचा उतारा.

(इ) संबंधित व्यक्तीच्या वडीलांच्या प्राथमिक / माध्यमिक शाळा सोडल्याच्या दाखला किंवा जन्म - मृत्यू नोंदवहीतील उतारा.

(फ) संबंधित व्यक्तीच्या जवळच्या नात्यातील म्हणजे वडील / वडील भाऊ / चुलते / चुलत भाऊ / चुलत बहीण किंवा रक्ताचे नातेसंबंध असलेल्या वडीलधारी नातेवाईकांचे जातीचे प्रमाणपत्र किंवा त्यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरमधील उतारा.

( ग) संबंधित व्यक्तीच्या वर नमूद केलेल्या रक्ताचे नातेसंबंध असलेल्या नातेवाईकांपैकी शासन सेवेत असलेल्या नातेवाईकांच्या सेवा पुस्तकातील जातीची नोंद असलेल्या पृष्टाचा प्रमाणित उतारा.

विशिष्ट प्रकरणात वरीलप्रमाणे नमूद केलेले पुराव्यांव्यतिरिक्त अतिरिक्त कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत अशी खात्री जाती प्रमाणपत्र तपासणी समितीची झाल्यास, ती कागदपत्रे मागण्याचा अधिकार समितीस राहील.

७. **वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना वेळेवर वैधता प्रमाणपत्र देण्याकरिता अवलंबावयाची कार्यपध्दती.**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र अभ्यासक्रमांसाठी राखीव जागा असतात. या जागांकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करताना जातीचा दाखला जोडावा मात्र प्रवेशाच्या वेळी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे त्यानंतरच राखीव जागेवर प्रवेश दिला जाईल. त्याकरिता खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

(अ) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेच्या इयत्ता ११ वीत शिकत असतांना विहित नमुन्यातील अर्ज व त्यामध्ये निर्देश केलेली कागदपत्रे खाली दर्शविलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे पाठविण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे प्रत्येक वर्षी ३० नोव्हेंबर पर्यंत सादर करावीत.

| समिती | जिल्हा | विभाग |
| --- | --- | --- |
| १) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे. गणेश पेठ, पांगुळ आळी, सुगंधा हॉटेल, पुणे विभाग, पुणे - ४११ ००२. | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर | पुणे विभाग |
| २) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोंकण विभाग, मुंबई. कोंकण भवन, ६ वा मजला, विस्तारित इमारत, रुम नं. ७१, नवी मुंबई - ४०० ०६१४. | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग | कोंकण विभाग |
| ३) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगर | नाशिक विभाग |

व विशेष मागासप्रवर्गांची जाती
प्रमाणपत्र पडताळणी समिती , नाशिक
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महसूल विभाग,
कार्यालय आवार, नाशिक रोड -४२२ १०१

| | | |
|---|---|---|
| ४) अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,औरंगाबाद, जालना रोड, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर व हिंगोली | औरंगाबाद विभाग |
| ५) अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर प्लॉट नं. १४३, श्री. ददे यांची इमारत, शिवाजीनगर, नागपूर. | वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर गडचिरोली, गोंदिया | नागपूर विभाग |
| ६) अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती गोविंद कुंज, अंबा पेठ, अमरावती विभाग, अमरावती. | बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ | अमरावती विभाग |

( ब) सर्व शैक्षणिक संस्थानी विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे दि. १५ डिसेंबर पर्यंत पोहचतील या बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी.

(क) संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्ज संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे ३१ डिसेंबर पर्यंत न चुकता पाठवावेत.

(ड) जे अर्ज विहित मुदतीत जात प्रमाणपत्र समितीकडे सादर होणार नाहीत असे अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाऊ नयेत.

(इ) जात प्रमाणपत्र समितीकडे प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची नोंद समितीने नोंद रजिस्टर मध्ये घेऊन एकूण प्राप्त झालेल्या अर्जां पैकी प्रत्येक महिन्यात किती अर्जांवर कार्यवाही केली वा अंतिम निर्णय घेतला या बाबतचा साद्यंत अहवाल समितीने पुढील महिन्याच्या १० तारखे पर्यंत शासनास सादर करावा.

(ई) संबंधित जात प्रमाणपत्र समितीकडे दि. ३१ डिसेंबर पर्यंत प्राप्त झालेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करुन त्या

प्रमाणपत्रांच्या वैध / अवैधतेबाबतचा आपला निर्णय सर्व विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत कळवावा.

(ड) एखाद्या जात प्रमाणपत्र समितीने दिलेल्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात प्रकरणात संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्या प्रकरणासंबंधीचे परिच्छेद निहाय अभिप्राय तसेच आवश्यकतेनुसार शपथपत्र, आवश्यक ती माहिती व कागदपत्रे शासनाच्या वतीने न्यायालयास विनाविलंब सादर करावेत. तसेच अशा प्रकरणांचा प्रगती अहवाल शासनास वेळच्या वेळी सादर करावा.

८. उच्च व तंत्रशिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभाग यांनी तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित अधिका-यांनी या शासन निर्णयाच्या प्रती विज्ञान शाखेच्या ११ वी व १२ वी इयत्तेचे वर्ग चालवित असलेल्या सर्व विश्वविद्यालयांना, महाविद्यालयांना, कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना पाठवाव्यात आणि या बाबीला प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. ही प्रसिध्दी शाळा / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर योग्य प्रकारची सूचना लावून प्रसिध्दी द्यावी. तसेच वर्गामध्ये स्वतंत्र बैठका घेऊन अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना या सुधारित पध्दतीची माहिती द्यावी. तसेच या शासन निर्णयातील सूचना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या वैयक्तिक नजरेस लेखी आणाव्यात व त्याची पोच रेकॉर्डवर ठेवावी.

९. <u>अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून ३ महिन्यात पडताळणी समितीचा निर्णय प्राप्त न झाल्यास नियुक्ती देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळामार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गा करीता राखीव असलेल्या पदावर शिफारस झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित विभागांनी / कार्यालयांनी जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबतची सर्व कागदपत्रे संबंधित अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावेत. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने जादा कागदपत्रांची मागणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांची पूर्तता केल्यानंतर ३ महिन्यात तपासणी समितीने निर्णय द्यावा. तपासणी समितीचा निर्णय या मुदतीत प्राप्त झाला नाही, तर संबंधित विभागाने उमेदवारास तपासणी समितीच्या निर्णयाच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक द्यावी. अशा प्रकरणात विलंब टाळण्याकरिता सर्व विभागांनी / कार्यालयांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

१०. हा शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. दा. [illegible])
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मंत्री /राज्यमंत्री ( समाजकल्याण व भटक्या विमुक्त जाती व इतर मागासवर्ग) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, वैधकीय शिक्षण व औषधी विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त.
सचिव, महराष्ट्र लोकसेवा आयोग,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा/ अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयचे खंडपीठ, औरंगाबाद / नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
आयुक्त, अनुसूचित जाती / जमाती, भारत सरकार, ५ वा माळा, लोकनायक भवन, नवी दिल्ली,
उपसंचालक, अनुसूचित जाती / जमाती आयोग, भारत सरकार, पिंपळूणकर भवन, शास्त्री मार्ग, नवी पेठ, पुणे - ४११०३०.

सचिव, कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
मुख्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी / सर्व उप जिल्हाधिकारी / सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / सर्व उप-विभागीय अधिकारी (महसूल) / सर्व तहसिलदार,
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई / पुणे / कोल्हापूर / नागपूर / अमरावती / नाशिक / औरंगाबाद
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी / शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई / शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागातील सर्व कार्यासने,
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, इमाव -5

अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर
मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांच्या उमेदवारांना शासन
सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थाच्या
सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत
वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९७/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ डिसेंबर, २००३

वाचा : (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८-ईएसटीटी (आरईएस) दिनांक १६ मार्च,१९९९

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग,क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्रक्र-१/इमाव-५ दिनांक २५ जानेवारी,२०००

प्रस्तावना : माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २.९.१९९४ रोजी निर्णय देतांना नियुक्तीपूर्वी सहा महिने अगोदर जातीचा दाखला पडताळून घेण्याबाबतचे निदेश दिलेले आहेत. तसेच अवर सचिव, भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १६.३.१९९९ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, नियुक्ती देतांना जातीच्या दाखल्याची योग्य ती पडताळणी व्हावी अशी शिफारस राष्ट्रीय अनुसूचीत जातीचा, जमाती आयोगाने केलेली आहे. ती शिफारस केंद्र शासनाने स्वीकारली असून, राज्य शासनाने त्यावर आवश्यक कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागाने दिनांक २५ जानेवारी,२००० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदावर ज्या उमेदवारांची लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळ/समितीमार्फत शिफारस केलेली आहे. त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधीत विभागाने/कार्यालयाने जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधीत अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत अशाप्रकारची तरतुद केलेली आहे. पडताळणी समितीला आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता उमेदवाराने केल्यानंतर तीन महिन्यात पडताळणी समितीने निर्णय द्यावयाचा असतो. तीन महिन्यात निर्णय दिला गेला नाही तर समितीच्या निर्णयाच्या अधीन राहून नेमणूक देण्याची तरतुद आहे. तात्पुरती नियुक्ती दिल्यानंतर यदाकदाचित जर जाती प्रमाणपत्र अवैध ठरल्यास संबंधीत कर्मचारी/ अधिकाऱ्याला सेवेतून काढून टाकण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- सीडीआर १०९३/१०५७/प्रक्र-२३/९३/अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर,१९९३ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीडीआर १०९५/९९५/प्र.क्र -३/९६/ अकरा, दिनांक ३१ ऑक्टोबर,१९९६ अन्वये तरतुद केली आहे. या तरतुदी असतांना देखील अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या व्यक्तींवर /उमेदवारांवर अन्याय होतो म्हणून त्यांना न्याय मिळण्यासाठी काही ठोस उपययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय : शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे (Undertaking), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हापरिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे/महामंडळ, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळांसह), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह), सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूत गिरण्या/बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणा-या शासन मान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर शिफारस झालेल्या/निवड केलेल्या उमेदवारांचे जाती प्रमाणपत्र तपासण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नियुक्ती प्राधिका-यांनी उमेदवारांना तात्काळ कळवावे व संबंधीत उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आंत संबंधीत प्राधिका-यांकडे करावी. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर विभागाने/कार्यालयाने तात्काळ संबंधीत जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने आवश्यक ती पूर्ण कागदपत्रे प्राप्त झाल्यावर सहा महिन्यांचे आंत निर्णय घ्यावा व संबंधीत विभागाने/ कार्यालयाने जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती द्यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणा-या सर्व अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती द्यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणा-या सर्व अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या कर्मचारी/ अधिकारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जाती दाव्याची तपासणी करण्यात यावी. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून कर्मचारी /अधिकारी यांच्या जाती प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये.

२. अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळेस तसेच पदोन्नतीच्या वेळेस जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जाती दाव्याबाबत वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात यावी. जाती दावा वैधता प्रमाणपत्र मिळण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे लक्षांत घेवून महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे नियमन) नियमावली, १९८२ च्या कलम ४ (२)(अ) नुसार सक्षम प्राधिका-याने मुदत वाढवून दिलेल्या कालावधीत उमेदवारांना हजर करुन घेण्यात यावे.

३. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.वा.मेहेर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विजाभज) यांचे खाजगी सचिव.

सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
प्रबंधक,उच्च न्यायालय (अपील शाखा/मूळशाखा), मुंबई
प्रबंधक,मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
सचिव,गृह मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

संचालक,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
संचालक,नगरपालिका प्रशासन,मुंबई
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक,आरोग्य सेवा,मुंबई
आयुक्त, अनुसूचीत जाती/जमाती, भारत सरकार, ५वा मजला, लोकनायक भवन, नवी दिल्ली
उप संचालक,अनुसूचीत जाती/जमाती आयोग,भारत सरकार, चिपळूणकर भवन,शास्त्री मार्ग, नवी पेठ,पुणे-३०
सचिव, कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली,
मुख्य निवडणुक आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, मुंबई
मुंबई महानगर दंडाधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई
सर्व जिल्हाधिकारी/ सर्व उप जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल) / सर्व तहसीलदार
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,मुंबई/पुणे/कोल्हापूर/नागपूर/अमरावती/नाशिक/औरंगाबाद
सर्व जिल्हापरिषदांचे शिक्षणाधिकारी/
शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई/ शिक्षणाधिकारी,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती-मावक-५

[illegible] जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना [illegible] संदर्भ, शासन संगणकृत संस्थामध्ये [illegible] जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेऊन प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, व विशेष सहाय्य विभाग
परिपत्रक क्रमांक-सीबीसी १०/२००५/[illegible]
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ५ मार्च , २००५

वाचा (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लिक ग्रिव्हन्सेस अँड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०२६/८/९८-ईस्टॅटी (आरईएस) दिनांक १६ मार्च,१९९९

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग क्रमांक-सीबीसी १२/२००१/२५२/प्रक्र-१/मावक-५ दिनांक २५ जानेवारी,२०००

(३) शासन निर्णय,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/मावक-५ दिनांक ८ डिसेंबर,२००३

(४) शासन निर्णय,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/मावक-५ दिनांक २८ जानेवारी,२००४ व समक्रमांचे शुध्दीपत्र दिनांक ६ फेब्रुवारी, २००४

## परिपत्रक

शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था/ जिल्हापरिषद नगरपरिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका/ ग्रामपंचायती/ मंडळे/ महामंडळे/ शासनाचे अंगीकृत व्यवसाय/ विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे/ शासकीय शिक्षण संस्था [illegible]/ सहकारी संस्था/ सहकारी साखर कारखाने/ सहकारी सूतगिरण्या/ बँका/ सहकारी बँका/ सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून [illegible] अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था/ मंडळे यांना त्यांच्या आस्थापनेवरील

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर [illegible] त्या उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राची / जाती दाव्याची वैधता तपासणे बंधनकारक राहील.

२ ज्या मागासवर्गीय कर्मचारी व अधिकाऱ्यांची जाती प्रमाणपत्राची पडताळणी अद्यापही झालेली नाही व सद्यस्थितीत पदोन्नतीच्या क्षेत्रात ( Zone of Consideration ) येत असतील असे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीच्या प्रक्रियेपूर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागाने जाती प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावी व नंतरच त्यांना पदोन्नती देण्यात यावी. तसेच सरळ सेवेने भरती प्रकरणी उमेदवाराने जाती प्रमाणपत्राची वैधता ६ महिन्यात सादर करणे आवश्यक राहील. मात्र ही सवलत निवडणूक क्षेत्रात ( Election of Local Bodies) लागू राहणार नाही. इच्छुक उमेदवाराने नामांकन भरण्यापूर्वी ६ महिने अगोदर आपल्या जाती प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यामार्फत समितीकडे अर्ज करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( डॉ. सुशिलाल गौतम )
प्रधान सचिव, सामाजिक न्याय

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विजाभज) यांचे खाजगी सचिव,
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
प्रबंधक उच्च न्यायालय (अपील शाखा/मूळशाखा), मुंबई
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
सर्व मंत्रालयीन विभाग,
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय